जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

3 FEB 2017

Times of India

# GEARING UP FOR FESTIVAL

Rahul Gaikwad



A painter works on the dome atop the main building of the Shivaji University. Preparations for the upcoming 32nd national inter-university youth festival, 'Shivotsav-2017,' which will begin on February 10, are in full swing

-3 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हा

पुढारी

# एज्युकेशन ग्रोथ रेशो ३० टक्के व्हावा : कुलगुरू प्रा. मालदार

## विद्यापीठात 'रसायनशास्त्रातील सृजनशील संशोधन २०१७' परिषद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारताचा एज्युकेशन ग्रोथ रेशो सध्या पंधरा टक्के इतका आहे. शैक्षणिक विकास वेगाने वाढणे अपेक्षित आहे. त्यामुळे हा एज्युकेशन ग्रोथ रेशो विकसित देशांइतका म्हणजेच तीस टक्के व्हावा, अशी अपेक्षा सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. एन. एन. मालदार यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागाने आयोजित केलेल्या 'रसायनशास्त्रातील सृजनशील संशोधन २०१७' या राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन कुलगुरू प्रा. डॉ. मालदार यांचे हस्ते बुधवारी झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रम वि.स.खांडेकर भाषा भवन येथे झाला. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे होते.

यावेळी प्रा. डॉ. मालदार म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठातून मला खूप शिकायला मिळाले आहे. त्यामुळे याबद्दल मी कृतज्ञ आहे.'

शास्त्रज्ञ प्रा. सतीशचंद्र ओगले म्हणाले, 'संशोधनामध्ये शिक्षक व विद्यार्थी यांचे नाते विद्यार्थ्यांच्या जिज्ञासुवृत्तीवर अवलंबून असते.' यावेळी त्यांनी स्वत: संशोधन केलेल्या सुपर कपॅसिटर, सोलर मॉडेल उसाच्या चिपाडापासून सच्छिद्र कार्बन बनवून त्याचा वापर सुपर कपॅसिटर म्हणून करू शकतो, हे सांगितले.

प्रभारी कुलगुरू डॉ. मोरे म्हणाले, 'विज्ञानातील संशोधनाचा वापर समाजोपयोगी व्हावा. भारतात सध्या ७९० विद्यापीठे कार्यरत असून फक्त इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स, बेगंलोर हे जगातील नावाजलेल्या २०० विद्यापीठांमध्ये १५७ क्रमांकावर आहे. त्यामुळे अनेक विद्यापीठांनी आपले स्थान पहिल्या २०० प्रगत विद्यापीठांमध्ये कसे येईल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.'

रसायनशास्त्र अधिविभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. एन. भोसले यांनी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय कार्याचा आढावा घेतला. परिषदेचे समन्वयक डॉ. जी. एस. राशिनकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. के. एम. गरडकर यांनी सूत्रसंचालन केले. सचिव डॉ. डी. एम. पोरे यांनी आभार मानले.

3 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

## एच. एम. देसरडा : शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे चर्चासत्र

# पर्यावरण ऱ्हास अर्थव्यवस्थेस बाधक

**कोल्हापूर :** भारतीय अर्थव्यवस्था ही पर्यावरणावर आधारित आहे. मात्र, सध्या पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास अर्थव्यवस्थेला बाधक ठरणारा आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. एच. एम. देसरडा यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. आर. जी. दांडगे होते. विद्यापीठातील अर्थशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटतर्फे आयोजित चर्चासत्राचा विषय 'निश्चिलनीकरण आणि केंद्रीय अर्थसंकल्प' असा होता. प्रा. देसरडा म्हणाले, नोटाबंदी नव्हे, तर नोटा बदली झाली आहे. सरकारचा नोटाबंदीचा डाव फसला आहे. आपल्या देशाचा समता मूलक शाश्वत विकास झाला पाहिजे, तरच देशाची अर्थव्यवस्था सुधारणार आहे. नोटाबंदीमुळे सध्या बँक व्यवस्था ढासळली आहे. अर्थसंकल्पात स्मार्ट सिटी, स्मार्ट इंडिया योजनांना कमी महत्त्व दिले आहे. ठरावीक कंपन्यांना मोठे करण्याचा सरकारचा उद्देश आहे. प्रा. दांडगे म्हणाले, नोटाबंदीचे आपल्यावर काही दूरगामी परिणाम होतात का ? हे पहावे लागणार आहे. कार्यक्रमात अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. कविता वड्राळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. शशिकांत पंचगल्ले यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)



शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागातर्फे गुरुवारी आयोजित केलेल्या चर्चासत्रात ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. एच. एम. देसरडा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून प्रा. आर. जी. दांडगे, डॉ. पी. एस. कांबळे, शशिकांत पंचगल्ले उपस्थित होते.

### डिजिटलचा बडेजाव करणारी दिशादृष्टी

नोटाबंदीच्या सावटाखाली प्रस्तुत केलेल्या अर्थसंकल्पाची दिशादृष्टी ज्या डिजिटल पद्धतीचा बडेजाव, कॅशलेसचा गवगवा करंणारी आहे, ही गोरगरिबांच्या हिताची नसल्याचे मत प्रा. देसरडा यांनी वार्तालापमध्ये व्यक्त केले. शेतकरी कामगार पक्षाने हा वार्तालाप आयोजित केला होता. त्यात प्रा. देसरडा म्हणाले, अर्थसंकल्पातील तथ्यांचा बारकाइनि विचार केला असता देशातील सामान्य जनतेला काही विशेष लाभ मिळेल असे जाणवत नाही. या कार्यक्रमास सुनीलकुमार सरनाईक, संभाजीराव जगदाळे, बाबूराव कदम, मधुकर हरेल, अजित सूर्यवंशी, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 FEB 2017

पुढारी

# पर्यावरणऱ्हासामुळे देशाची अर्थव्यवस्था ठासळली : प्रा.देसरडा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पर्यावरणऱ्हासामुळे देशाची अर्थव्यवस्था ठासळली, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे माजी सदस्य प्रा.एच.एम. देसरडा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने 'निश्चलीकरण आणि केंद्रीय अंदाजपत्रक २०१७-१८' या विषयावर आयोजित केलेल्या विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा.आर. जी.दांडगे हे उपस्थित होते.

प्रा. देसरडा म्हणाले, भारताचा समताधिष्ठित शाश्वत विकास झाला तरच देशाची अर्थव्यवस्था सुधारू शकेल. भारत हा नैसर्गिक संसाधनांचा देश आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही पर्यावरणावर आधारित आहे. पण, पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे विपरीत, बाधक असे परिणाम होत आहेत. सध्या नोटाबंदीमुळे बँक व्यवस्था ढासळली आहे. असे असले तरी या धोरणाचे दुरगामी परिणाम काय होतील, हे पहावे लागणार आहे.

प्रा. देसरडा म्हणाले, केंद्रीय अर्थसंकल्पात गांधीजींचे नाव पाच वेळा घेण्यात आले, पण स्मार्ट सिटी व स्मार्ट इंडीया याचा कोठेही उल्लेख अर्थसंकल्पीय भाषणात करण्यात आला नाही. प्रा. आर. जी. दांडगे म्हणाले, नोटाबंदी व अंदाजपत्रकाचा दुरगामी परिणाम अर्थव्यवस्थेवर कसा होतो, हे पाहावे लागणार आहे.

प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.पी.एस.कांबळे यांनी केले. सुत्रसंचालन डॉ.कविता वड्राळे यांनी केले डॉ.शशिकांत पंचगल्ले यांनी आभार मानले. कार्यक्रमास विद्यापीठातील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

3 FEB 2017

महाराष्ट्र टाईम्स

# 'पर्यावरण ऱ्हासामुळे अर्थव्यवस्था ढासळली'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'भारत नैसर्गिक साधन संपत्तीचा देश आहे. त्या साधन संपत्तीवरच अवलंबून शेतीवर भारताची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. पण, पर्यावरणऱ्हासामुळे देशाची अर्थव्यवस्था ढासळली आहे,' असे मत प्रा. एच. एम. देसरडा यांनी आज येथे व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने 'निश्चलीकरण आणि केंद्रीय अंदाजपत्रक २०१७-१८' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रा. देसरडा बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. आर. जी. दंडगे होते.

नुकत्याच जाहीर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावरही प्रा. देसरडा यांनी मत मांडले. ते म्हणाले, 'भारताचा विकास होताना तो समताधिष्ठित आणि शाश्वत विकास झाला पाहिजे. तरच देशाची अर्थव्यवस्था सुधारू शकेल. भारत हा नैसर्गिक संसाधनांचा देश आहे. शेतीची निगडीत अर्थव्यवस्था असल्याने अर्थातच ती पर्यावरणावर अवलंबून आहे. पण, गेल्या काही वर्षांत भारतात पर्यावरणाचा ऱ्हास होत मोठ्या प्रमाणावर होत आहे. सध्या नोटाबंदीमुळे बँकिंग व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. पण, देशाच्या अर्थव्यवस्थेवर या धोरणाचे दूरगामी परिणाम काय होतील हे पहावे लागणार आहे. अर्थसंकल्पात स्मार्ट सिटी व स्मार्ट इंडिया याचा गेल्या वर्षीच्या घोषणांचा कोठेही उल्लेख करण्यात आला नाही, अशी टिप्पणीही प्रा. देसरडा यांनी केली. प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले.



प्रा. एच. एम. देसरडा

-3 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# संभ्रमाच्या काळात 'उभं आडवं' ग्रंथ आशावादी

## एन. डी. पाटील : शिवाजी विद्यापीठामधील चर्चासत्रात मांडले विचार

**कोल्हापूर :** सध्याचा काळ हा संभ्रमात टाकणारा आणि गोंधळाचा आहे. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांमध्ये आशादायक वाटावे असे वातावरण नाही. या पार्श्वभूमीवर जात, धर्म, साहित्यविषयक चिंतन परखडपणे मांडणाऱ्या, चिकित्सा करणाऱ्या 'उभं आडवं' या ग्रंथाचे महत्त्व मोठे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आणि 'मुक्त शब्द मासिका'तर्फे लेखक राहुल कोसंबी लिखित 'उभं आडवं' या ग्रंथाबाबतच्या चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अभ्यासक किशोर बेडकीहाळ होते. प्रा. पाटील म्हणाले, गेल्या शंभर वर्षांमध्ये राजकीय, सामाजिक चळवळींनी अनेक गोष्टी आपल्या सोयीने जात, धर्मविषयक गुंते निर्माण होऊन गोंधळाचे वातावरणात वाढले आहे. त्यासाठी हा ग्रंथ आशावादी आहे. चर्चासत्राच्या प्रारंभी लेखक कोसंबी यांनी लेखनामागील आपली भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर डॉ. गजानन अपिने, रणधीर शिंदे, केशव वाघमारे, उदय रोटे यांनी या ग्रंथावरील अभ्यासपूर्ण निबंध वाचन केले.

यावेळी 'शब्द पब्लिकेशन'चे येशू पाटील, विचारवंत आनंद तेलतुंबडे, ज्येष्ठ समीक्षक डॉ. हरिश्चंद्र थोरात, शुभांगी थोरात, नितीन वाघ, आदी उपस्थित होते. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)



शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे बुधवारी 'उभं आडवं' ग्रंथाबाबत आयोजित केलेल्या चर्चासत्रात ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून येशू पाटील, राहुल कोसंबी, ज्येष्ठ अभ्यासक किशोर बेडकीहाळ, प्रा. डॉ. राजन गवस उपस्थित होते.

### नव्या पिढीसाठी दिशादर्शक

चर्चासत्रात मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. त्यात त्यांनी आज़ वैचारिक लेखन आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासच होत नाही. लोक हे 'स्पेशलायझेशन'च्या जमान्यात वावरत आहेत. अशा काळात कोसंबी यांचे हे पुस्तक नव्या पिढीसाठी दिशादर्शक आहे. त्यामुळे विभागातील विद्यार्थी, नवअभ्यासकांना दिशादर्शन व्हावे म्हणून मराठी विभागाने हे चर्चासत्र घेतले आहे.

E-3 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India

# Job fair at university today

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The skill development, employment and entrepreneurship information centre of the Shivaji University, Kolhapur and the Gopal Krishna Gokhale College will hold a one-day job-fair at the university's department of Technology premises today.

According to the information centre director ST Jadhav, over 700 employment opportunities will be up for grabs in this job fair. Students will be able to enrol themselves for the fair at the venue from 10am to 4pm.

Students need to bring their resume, along with academic certificates, Jadhav said, adding that students form class 10 and class 12, ITI students, diploma, graduate, post-graduate, MCA, MBA and BE can appear.

"We have also organised an interactive session on cashless transactions and its usage during the event. It will give students an opportunity understand digital economy," he added.

A university official added that the institution has learnt a lot from its first job-fair organised in January 2016. Last year the fair witnessed a chaotic situation was created due to the high number of participants, leaving a lot of students disappointed.

The official added that in the first job-fair over 800 students had got the job offers. The participating companies then had asked the university about some basic must-have skills for students, following which the university had organised a skill fair in March 2016, which received a tremendous response.

"The university is getting a good response from regional as well as national companies for placements and they will try to invite more companies for various faculties in the future," said the official.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 FEB 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज कौशल्य, रोजगार मेळाव्याचे आयोजन

**कोल्हापूर** : विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे आज(दि. ३) सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ येथे कौशल्य व रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. १० वी पास, आयटीआय, ते पदव्युत्तर पदवी पात्रता असणारी विविध आस्थापनांची ७६४ पदे अधिसूचित आहेत. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीस येताना शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे, बायोडेटा ३ प्रतीत, एम्प्लॉयमेंटचे ऑनलाईन कार्ड तसेच पात्र पदासाठी ऑनलाईन ३ ठिकाणी अप्लाय करणे आवश्यक असल्याची माहिती विद्यापीठाच्या रोजगार व माहिती व मार्गदर्शन केंद्राचे सहायक संचालक स. ता. जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 3 FEB 2017

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभागात उद्योजक विकास मार्गदर्शन

**कोल्हापूर :** सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या वतीने 'इनक्युबेटर उद्योजगता आणि व्यवस्थापन विकास योजना' या विषयावर जागरुकता आणि मार्गदर्शनपर कार्यक्रम शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाद्वारे सक्षम भावी उद्योजक घडवण्याच्या उद्देशाने राबवण्यात येणाऱ्या भारत सरकारच्या इनक्युबेटर योजनेची सविस्तर माहिती तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थ्यांना देण्यात आली. पाहुण्यांचे आणि कंपन्यांच्या प्रतिनिधींचे स्वागत तंत्रज्ञान अधिविभाग संचालक प्रा. डॉ. जयदीप बागी यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन तंत्रज्ञान अधिविभागातील ट्रेनिंग व प्लेसमेंटसेलने केले तर प्रा. अमर डूम यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 FEB 2017
सकाळ

# नाईट कॉलेजमध्ये राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर, ता. २ : येथील नाईट कॉलेज ऑफ आर्ट अँड कॉमर्समध्ये शनिवारी (ता. ४) आंतर विद्याशास्त्रीय राष्ट्रीय चर्चासत्र होत आहे. भारतातील सामाजिक शास्त्रे, भाषा, साहित्य, वाणिज्य, खेळ यामधील समकालीन प्रवाह या विषयावर हे चर्चासत्र होणार आहे. कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम यांच्या हस्ते या चर्चासत्राचे उद्घाटन होईल. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव विलास नांदवडेकर उपस्थित राहणार आहेत. प्रसिद्ध साहित्यिक डॉ. राजन गवस यांचे बीजभाषण होणार आहे; तर ज्येष्ठ नेते एन. डी. पाटील मार्गदर्शन करणार आहेत. चर्चासत्रात कर्नाटक, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, गोवा, महाराष्ट्र आदी राज्यांतील संशोधक, प्राध्यापक शोध निबंध सादर करणार आहेत.